# महाराष्ट्रशासन

सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांक एमएजी. १०९५/प्र.क्र.४५/आरोग्य - ३
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ नोव्हेंबर २०००

पहा (एक) शासन निर्णय, नगरविकास व सार्वजनिक, आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी. १०७६ ७९८१९, दिनांक ६ में १९६८

(दोन) शासन निर्णय, नगरविकास व सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी १०७१/ ४१८०१/एस. दिनांक २९ एप्रिल १९७४

(तीन) शासकीय पत्र, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक लोसंधो-२०००/प्र.क्र.-५७/००/ कु.क.१, दिनांक ९ में २०००.

प्रस्तावना -

लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन पॉप्युलेशन डेव्हलेपमेंटमध्ये पारित केलेल्या ठरावांच्या अनुषंगाने कुटुंब कल्याण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत आमुलाग्र बदल झाल्याने, बदलत्या परिस्थितीचा विचार करून, राज्याचे सर्वकष लोकसंख्या धोरण शासनाने संदर्भाधीन अनुक्रमांक ३ नुसार जाहीर केले आहे. या धोरणानुसार दोन अपत्यापर्यंतचे कुटुंब म्हणजेच ''छोटे कुटुंब'' या संकल्पनेचा स्वीकार करण्यात आला आहे. या संकल्पनेअन्वये वैद्यकीय देखभाल नियमानुसार मिळणाऱ्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी शासकीय/ निमशासकीय कर्मचाऱ्यांचे कुटुंब २ (दोन) हयात अपत्यापर्यंत मर्यादित ठेवणाऱ्यांना पात्र ठरविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुरूप महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम,१९६१ मध्ये सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय -

या प्रश्नाचा विचार करून याद्वारे महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ मधील नियम १४ व १५ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(अ) महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ मधील नियम, १४ ऐवजी पुढील प्रमाणे नियम १४ वाचण्यात यावा.

१४- '' ज्यांना २ पेक्षा कमी अपत्ये असतील अशा कुटुंबांनी २ हयात अपत्याइतके आपले कुटुंब मर्यादित ठेवलेले नसेल किंवा ज्यांना २ पेक्षा जास्त हयात अपत्ये असतील अशा कुटुबांनी आपले कुटुंब सध्या आहे एवढेच मर्यादित ठेवले नसेल.

अशा कुटुंबांना वरिल नियमानुसार शासकीय कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना मिळणाऱ्या विनामूल्य वैद्यकीय उपचारासंबंधीच्या सवलती मिळणार नाहीत.''

(ब) महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ मधील नियम, १५ एवेजी पुढीलप्रमाणे नियम १५ वाचण्यात यावा.

शासनाच्या धोरणानुसार दिनांक १ मे २००१ रोजी ज्यांची २ पेक्षा अधिक अपत्ये हयात आहेत अशा आई डिलांनी (स्त्री/पुरूष) त्या तारखेनंतर त्यांच्या कुटुंबातील अपत्यांची संख्या वाढविता कामा नये. त्या तारखेनंतर यांच्या कुटुंबातील अपत्यांची संख्या वाढल्यास त्यानंतर जन्मलेल्या अपत्यांना आणि आईवडिलांना वैद्यकीय सोयी ळण्याचा हक्क राहणार नाही. मात्र विनामूल्य, वैद्यकीय उपचाराच्या सवलती मिळण्याचा हा नियम अंमलात येण्यापूर्वी स्तित्वात असलेल्या नियमानुसार ज्यांना हक्क होता अशा अपत्यांना अनुज्ञेय असलेल्या विनामूल्य उपचाराच्या सोयी ळण्याचे चालूच राहील. तसेच निर्बिजीकरणाची शस्त्रक्रिया करून घेतली असेल आणि अशी शस्त्रक्रिया जेथे करण्यात ली त्या रूग्णालयाच्या किंवा दवाखान्याच्या प्रभारी सक्षम वैद्यकीय प्राधिकाऱ्यांचे तशा अर्थाचे प्रमाणपत्र सादर केले सेल तर शस्त्रक्रिया केलेल्या तारखेपासून वैद्यकीय सवलती मिळण्याचा त्यांना पुन्हा हक्क राहील. परंतू ठरवून दिलेल्या र्यादेहून अधिक असलेलया अपत्यांना अशा सवलती मिळणार नाहीत.''

या आदेशान्वये विहित केलेल्या कुटुंबांच्या कमाल मर्यादेची अट कोणत्याही परिस्थितीत शिथिल केली जाणार नाही.

उपरोक्त नियमातील तरतूद दिनांक १ में २००१ पासून अमलात येईल.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५८/वै.अस./सेवा-५, दिनांक १ मार्च २००० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

एल.जी. इप्पेवार,
शासनाचे उप सचिव.